# नवी मुंबई महानगरपालिका
## महापालिका सर्वसाधारण सभा

महानगरपालिकेच्या शुक्रवार, दिनांक 19 जानेवारी 2018 रोजी भरलेल्या माहे सप्टेंबर 2017 महिन्याच्या सर्वसाधारण तहकुब सभेत मंजूर/नामंजूर इ. ठरावाची माहिती संक्षिप्त आणि मसुदा स्वरूपात खालीलप्रमाणे आहे.:-

| | |
|---|---|
| **विषय क्र. 02**<br>**दिनांक 19 सप्टेंबर 2017.** | **प्रश्नोत्तरे** |
| **निर्णय** | **मंजूर** |

**महानगरपालिकेने मंजूर केलेल्या आणि उचित कार्यवाहीसाठी पाठविलेल्या ठरावांची यादी**

**माहे 19 सप्टेंबर 2017 ची सर्वसाधारण सभा**

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 1. | **श्रीम. संगिता संदिप म्हात्रे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 45, कोपरखैरणे मधील संपूर्ण रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | 32<br>सप्टेंबर | 125<br>19/01/2018 | मंजूर |
| 2. | **श्रीम. संगिता संदिप म्हात्रे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 45, कोपरखैरणे मधील संपुर्ण गटारांची दुरावस्था झाल्याने हेवीड्युटी गटार बनविणे. | 33<br>सप्टेंबर | 126<br>19/01/2018 | मंजूर |
| 3. | **श्रीम. संगिता संदिप म्हात्रे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 45, कोपरखैरणे मधील "चिकणेश्वर बस डेपो" मुख्य नामकरण प्रवेशद्वार बनविणे. | 34<br>सप्टेंबर | 127<br>19/01/2018 | मंजूर |
| 4. | **श्रीम. तनुजा श्रीधर मढवी, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 83, जुईनगर येथील प्रस्तावित असलेल्या चारही मार्केट व स्टॉलच्या भूखंडाचे सिडकोकडून पालिकेकडे लवकरात लवकर हस्तांतरण करून घ्यावे व नागरिकांसाठी सुसज्ज असे मार्केट बनविणे. | 38<br>सप्टेंबर | 128<br>19/01/2018 | मंजूर |
| 5. | **श्रीम. तनुजा श्रीधर मढवी, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 83, जुईनगर अंतर्गत असलेल्या जल उचंदन केंद्रावर सुरक्षेसाठी सुरक्षा रक्षक नेमावेत त्याच प्रमाणे संरक्षक भिंतीची अदययावत दुरूस्ती करून मुख्य प्रवेशद्वाराची दुरूस्ती करावी व आतील परिसरात रस्ते व पथदिव्यांची पुरेशी सोय करणे. | 39<br>सप्टेंबर | 129<br>19/01/2018 | मंजूर |
| 6. | **श्रीम. तनुजा श्रीधर मढवी, यांजकडून :-**<br>महानगरपालिकेत नवीन नोकर भरती करताना सर्वप्रथम स्थानिक भूमीपूत्रांच्या वारसांना नोकर भरतीत अग्रक्रम देऊन भूमीहीन झालेल्या भूमीपूत्रांच्या वारसांच्या बेकारीच्या समस्येवर उपाय योजना करणे. | 40<br>सप्टेंबर | 130<br>19/01/2018 | मंजूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 7. | **श्री. रविंद्र उध्दव इथापे, यांजकडून :-**<br>नवी मुंबई महानगरपालिकेच्या नेरूळ, बेलापूर, कोपरखैरणे, ऐरोली येथील रूग्णालयामधील रूग्णांसाठी वापरण्यात येणारे बेडशिट, पिलो कव्हर, तसेच अंगावरील चादर रोज बदली करणे आवश्यक आहे व रोज बदली केलेले बेडशीट, पिलो कव्हर अंगावरील कपडे धुणे आवश्यक आहे. त्याकरीता महानगरपालिकेच्या रूग्णालयामध्ये स्वतंत्र लॉन्ड्रीची व्यवस्था करणे. | 51<br>सप्टेंबर | 131<br>19/01/2018 | मंजूर |
| 8. | **श्रीम. मनिषा शशिकांत भोईर, यांजकडून :-**<br>पावणेगांव येथील मुख्य रस्ता गांवदेवी मार्ग, अष्टविनायक मार्ग, शिवमंदिर मार्ग, श्रीगणेश मार्ग, स्मशानभूमी मार्ग या रस्तावर सुरक्षेसाठी महानगरपालिकेने सी.सी.कॅमेरा यंत्रणा लावणे. | 52<br>सप्टेंबर | 132<br>19/01/2018 | मंजूर |
| 9. | **श्रीम. मनिषा शशिकांत भोईर, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 48, येथील नागरी वस्ती पावणेगांव श्रमिकनगर येथील डेब्रिजसाठी घनकचरा सारखे एक भाग (स्पॉट) निश्चित करावे व त्यासाठी डेब्रिज टाकणारे व्यक्तीकडून शुल्क घ्यावे व सदर डेब्रिज उचलणेची व्यवस्था महानगरपालिकेने करणे. | 53<br>सप्टेंबर | 133<br>19/01/2018 | मंजूर |
| 10. | **श्रीम. मनिषा शशिकांत भोईर, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 48, येथील प्राथमिक शाळा पावणे / श्रमिकनगर स्मशानीभूमी पावणे / नागरी आरोग्य केंद्र पावणे, समाजमंदिर इमारती पावणे / श्रमिकनगर ग्रंथालय इमारत पावणे येथे सुरक्षेसाठी सी.सी.कॅमरे यंत्रणा लावणे. | 54<br>सप्टेंबर | 134<br>19/01/2018 | मंजूर |
| 11. | **श्रीम. संगीता दिलीप बोऱ्हाडे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 76, सानपाडा मधील से. 4 येथील मार्केट बांधणे. | 60<br>सप्टेंबर | 135<br>19/01/2018 | मंजूर |
| 12. | **श्रीम. संगीता दिलीप बोऱ्हाडे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 76, सानपाडा मधील से.3 बधाई येथील चौकात हायमास्ट बसविणे. | 61<br>सप्टेंबर | 136<br>19/01/2018 | मंजूर |
| 13. | **श्रीम. संगीता दिलीप बोऱ्हाडे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 76, सानपाडा मधील से.2 येथील मैदानात ओरिएंटल कॉलेजच्या बाजूने संरक्षक भिंत बांधणे. | 62<br>सप्टेंबर | 137<br>19/01/2018 | मंजूर |
| 14. | **श्रीम. मोनिका लक्ष्मीकांत पाटील, यांजकडून :-**<br>घणसोली विभागात सेक्टर 6 मध्ये महिला समक्षीकरण केंद्राचे काम पूर्ण झालेले आहे. त्यांचे लवकरात लवकर उद्घाटन करून समाजविकास विभागामार्फत महिला व बालकल्याण समिती व समाज कल्याण व झोपडपट्टीसुधार समितीमार्फत ज्या योजना आखल्या जातात. त्या या सक्षमीकरण केंद्रामध्ये सुरू करण्यात याव्यात. महिला बालके व युवक यासाठी येणाऱ्या योजना येथे राबविल्या जाव्यात. महिलासाठी व्यवसाय प्रशिक्षण दिले जाते. शिवणकाम, ब्युटीशिन, कागदी कापडी पिशव्याचे प्रशिक्षण येथे यावर्षीपासूनच सुरू करण्यात याव्यात. योजना जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी जास्तीत जास्त जाहिरात करणे. | 72<br>सप्टेंबर | 138<br>19/01/2018 | मंजूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 15. | **श्रीम. मोनिका लक्ष्मीकांत पाटील, यांजकडून :-**<br>घणसोली विभागामध्ये नवी मुंबई महानगरपालिका व वन विभागातंर्गत असलेल्या गवळीदेव व सुलाईदेवी येथे काही सुविधांचा अभाव असल्याने गवळीदेव व सुलाईदेवी येथे अनैतिक प्रकार टाळण्यासाठी सुरक्षा रक्षक नेमण्यात यावेत व या दोन्ही देवस्थानासाठी मंदिरांना चौथरा बांधून विसावा शेड करण्यात यावे, डोंगराला संरक्षक कठडा बांधण्यात यावेत, दगडी पायऱ्या बांधण्यात याव्यात, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात यावी, पायवाट सुधारण्यात यावी, छोटे-छोटे पुल बांधण्यात यावेत, शौचालयाची व्यवस्था करण्यात यावी, कॅन्टींगची, अल्पोहाराची व्यवस्था करण्यात यावी, पार्किंग व्यवस्था करणे, दिशादर्शक फलक लावण्यात यावेत, पशुपक्षी व प्राण्यांच्या संरक्षणासाठी व तेथील रानभाज्या व रानमेवा यांच्या अस्तिवासाठी योग्यती उपाययोजना करण्यासाठी स्थापना करणे. | 73<br>सप्टेंबर | 139<br>19/01/2018 | मंजूर |
| 16. | **श्रीम. उषा पुरूषोत्तम भोईर, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 56, कोपरीगांव येथील हनुमानमंदिर ते कोपरी तलाव हा गावातील मुख्य रस्ता आहे. यावर्षी अतिवृष्टी झाल्यामुळे गावातील मुख्य व अनेक रस्त्यांना मोठे खड्डे आहेत. तसेच रस्त्यावरील डांबरी थर वाहून गेले आहे. गावातील अनेक घरांचा पाया (Plinth) रस्त्याच्या खालील गेले आहेत. कोपरी गावातील शाळेचा पाया (Plinth) देखील रस्त्याच्या स्तराप्रमाणे एक समान झाला आहे. पावसाळ्यात अनेक लोकांच्या घरात पाणी जात असते. सदर रस्त्यांची उंची न वाढवता रस्त्याचे (Asphalt Concrete) कॉक्रीटीकरण करणे. | 77<br>सप्टेंबर | 140<br>19/01/2018 | मंजूर |

**सही/-**

**(चित्रा बाविस्कर)**

**महापालिका सचिव**

**नवी मुंबई महानगरपालिका**